**CNR No :- MHSI100002052018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. २०/२०१८ :–

## –: निशाणी ४८ वरील आदेश :–

वादी यांनी त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला दि.१३.१०.२०२५ रोजीचा "पुरावा रद्द(discard)" चा आदेश रद्दबातल होऊन मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, उलटतपास न देण्यामागे वादी यांचा कोणताही गैरहेतु अगर निष्काळजीपणा नव्हता. वादी वयोवृद्ध असुन आजारी असल्याने वेळीच उपस्थित राहुन जाबजबाब देणे अडचणीचे झालेले होते. वादी विरुद्ध पारीत झालेला witness discard चा आदेश रद्दबातल न झाल्यास वादी यांचे अपरीमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. सबब, वादी विरुद्ध पारीत झालेला "पुरावा रद्द(discard)"चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र.५० वर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरीस विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, वादी हे सदर दाव्यात दि.२०.०३.२०२४ रोजी पासुन पुरावा देण्यास दिरंगाई करत आहेत. वादीचा हेतु प्रतिवादी यांना नाहक त्रास देण्याचा आहे. सबब, वादीचा अर्ज जास्तीत जास्त दंड आकारुन नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्याद्वारे केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीतर्फे साक्षीदार क्र. १ हा हजर न राहील्याने त्यांच्या विरुद्ध "पुरावा रद्द(discard)" चा आदेश नि.क्र.४४ वर दि.१३.१०.२०२५ रोजी पारीत करणेत आला. वादीने अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक असल्याचे दिसुन येत नाही. या कारणास्तव दावा चालविण्यास विलंब होत आहे. परंतु, वादीला प्रस्तुत दाव्यामध्ये पुरावा देण्याची संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणार नाही. वाद विषयाच्या गुणदोषावर अंतिम निर्णय करण्यास वादीच्या पुराव्या आधारे न्यायालयास मदत होणार आहे. वादीने केलेल्या विलंबाबाबत खर्चाच्या स्वरुपात परीमार्जन होणारे आहे. त्यामुळे खर्चाच्या आदेशासह अर्ज मंजुर होऊन मिळणेस वादी पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

**-:: आदेश ::-**

१. रक्कम रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र. ४८ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ यांनी प्रस्तुत अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) प्रतिवादी क्र. १ व २ यांस पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदा केल्यावर; नि.क्र.४४ वरील दि.१३.१०.२०२५ रोजीचा वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ विरुद्ध पारीत झालेला पुरावा रद्द (evidence discard) चा आदेश, रद्दबातल करण्यात येत आहे.

३. पुढील नेमल्या तारखेपर्यंत सदर आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.01.07 17:15:45 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)
दिनांक – ०७.०१.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
दोडामार्ग.